Literacy for a Billion

Movie: Aai
Year: 1981

Song: Seva dharmi punya aahe
Lyricist: Jagdish Khebudkar

सेवा धर्मी पुण्य आहे
सांगे सखा श्रीहरी
सेवा धर्मी पुण्य आहे
सांगे सखा श्रीहरी
देवांचाही देव करितो
भक्तांची चाकरी
देवांचाही देव करितो
भक्तांची चाकरी
देवांचाही देव करितो
भक्तांची चाकरी

भल्या पहाटे गाऊन ओवी
आ... आ
भल्या पहाटे गाऊन ओवी
जनीचे जाते ओढी
सुख दुःखाचं जातं
परमार्थाचा त्याचं
घास मी भरीला
जनी गाते ओव्या रे तू
ये रे बा विठ्ठला
ये रे बा विठ्ठला
ये रे बा विठ्ठला
भल्या पहाटे गाऊन ओवी
जनीचे जाते ओढी
संत सखूचा कैवारी हा
संत सखूचा कैवारी हा
रांधून उष्टे काढी
सावत्यासंगे भाजी खुडूनी
मळा राखणी करी

सावत्यासंगे भाजी खुडूनी
मळा राखणी करी
देवांचाही देव करितो
भक्तांची चाकरी
देवांचाही देव करितो
भक्तांची चाकरी

नाथा घरीही विठू माऊली
अखंड भरते पाणी
नाथा घरीही विठू माऊली
अखंड भरते पाणी
राम सावळा शेले विणतो
कबीर गातो गाणी
राम सावळा शेले विणतो
कबीर गातो गाणी
गोऱ्यासंगे चिखल तुडविता
तल्लीन हो अंतरी
गोऱ्यासंगे चिखल तुडविता
तल्लीन हो अंतरी
देवांचाही देव करितो
भक्तांची चाकरी
देवांचाही देव करितो
भक्तांची चाकरी

देवालाही चुकला नाही
कर्म भोग हा असा
देवालाही चुकला नाही
कर्म भोग हा असा
अजाणता हा परमात्म्याला

आत्मा भेटे जसा
अजाणता हा परमात्म्याला
आत्मा भेटे जसा
अगाध आहे नियतीची ही
किमया परमेश्वरी
अगाध आहे नियतीची ही
किमया परमेश्वरी
देवांचाही देव करितो
भक्तांची चाकरी
देवांचाही देव करितो
भक्तांची चाकरी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*